महाराष्ट्र शासन
नगरपरिषद प्रशासन संचालनालय


| | |
|---|---|
| दूरध्वनी क्र. ०२२ २७५६०१४५<br>इ-मेल-bindunamavali.dma@gmail.com<br>Website: https://mahadma.maharashtra.gov.in | ७ वा मजला, नवी मुंबई महानगरपालिका इमारत, सी.बी.डी बेलापूर मुंबई-४००६१४. |


नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग पदभरती/अंतिम निवडसूची/२०२६/2449596 दि. 01 SEP 2026

*** प्रसिध्दीपत्रक ***

विषय :- महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा २०२३ महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य), गट-क (श्रेणी - क) भाग - ३ अंतिम निवडसूची व भाग - ४ अतिरिक्त अंतिम निवडसूची (प्रतिक्षायादी) प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ०४ मे, २०२२.
२.नगरपरिषद प्रशासन संचालनालयाची जाहिरात क्र. नपप्रसं/कक्ष-३ ब/संवर्ग . पदभरती/प्र.क्र.०१/२०२३/३८३४ दि. ११ जुलै, २०२३.
३. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे प्रसिद्धीपत्रक क्र. नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग . पदभरती/अंतिम निवडसूची /२०२४ /५५१८ दि. १० सप्टेंबर, २०२४.
४.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ०२ डिसेंबर, २०२५.
५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ ( सेवा -४ ) दि. ०२ फेब्रुवारी, २०२६.
६. नगर विकास विभाग यांचे पत्र क्रमांक:एमसीओ-२०२६/प्र. क्र.१११ /नवि -१४ दि-११ ऑगस्ट, २०२६.

महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा २०२३ करीता दि. ११ जुलै, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून प्राप्त अर्जानुसार उमेदवारांची राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर दि. २५ ऑक्टोबर, २०२३ ते २४ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. सदर परीक्षेत उमेदवारांना संवर्गनिहाय प्राप्त झालेले गुण नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या https://mahadma.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. १५ मार्च, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते.

संदर्भ क्र ६ दिनांक ११ ऑगस्ट २०२६ रोजीच्या नगर विकास विभागच्या पत्रानुसार खालील तक्त्यात नमूद संवर्गाची भाग - ३ अंतिम निवडसूची आणि भाग - ४ अतिरिक्त अंतिम निवडसूची ( प्रतिक्षसूची ) या द्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग |
|---|---|
| १ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य), गट-क (श्रेणी - क) |

**उमेदवारांना सूचना :-**

१. सदरच्या भाग -३ अंतिम निवडसूची आणि भाग ४ अतिरिक्त अंतिम निवडसूचीमध्ये नाव समाविष्ट केले म्हणजे त्या उमेदवारास नियुक्ती दिली असा अर्थ होत नाही.

२. अंतिम निवडसूचीतील उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर केलेल्या प्रमाणपत्रांची पडताळणी जसे खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक, पदवीधर अंशकालीन, दिव्यांग व अनाथ या समांतर आरक्षणांतर्गत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांच्या तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राची पडताळणी संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या सक्षम प्राधिकारी यांचेकडून करुन घेण्यात येईल. सदर पडताळणीअंती संबंधित उमेदवार नियुक्तीस पात्र ठरल्यासच नियुक्ती आदेश देण्यात येतील.

३. जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे संवर्गनिहाय आणि श्रेणी क निहाय आवश्यक संख्येइतके दिव्यांग व अनाथ उमेदवार पात्र न ठरल्यास शासन निर्णयानुसार अराखीव प्रवर्गातील त्या संख्येइतकी पदे रिक्त ठेवण्यात आलेली आहेत.

४. उमेदवाराने सादर केलेली माहिती चुकीची / खोटी आढळल्यास अगर सामाजिक / समांतर आरक्षणाबाबतचे प्रमाणपत्र संबंधीत सक्षम प्राधिकारी यांनी अवैध / बाद ठरविल्यास, तसेच वैद्यकीय तपासणी अहवालानुसार अपात्र ठरविल्यास, संबंधीत उमेदवाराला नियुक्ती दिली जाणार नाही.

५. दिव्यांग कल्याण विभागाकडील दि. १६ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या दिव्यांगांना नियुक्ती देण्यापूर्वी दिव्यांग उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा नाही याची वैद्यकिय मंडळाकडून तपासणी करण्याच्या सूचना दिलेल्या असून त्यानुसार अंतिम निवडसूचीमधील सर्व दिव्यांग उमेदवारांच्या दिव्यांगत्वाची तपासणीचे वेळापत्रक स्वतंत्ररीत्या प्रसिध्द करण्यात येईल. सदर वैद्यकिय तपासणीमध्ये दिव्यांग उमेदवार अपात्र ठरल्यास अथवा किमान ४०% पेक्षा कमी दिव्यांगत्वाचे प्रमाण दिसून आल्यास सदर उमेदवाराचे अंतिम निवडसूचीतून नाव वगळण्यात येईल.

६. दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत वैद्यकीय मंडळाकडून तपासणी झाल्याशिवाय संबंधित दिव्यांग उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाहीत.

७. लागू समांतर आरक्षणामध्ये दर्शविण्यात आलेल्या संक्षिप्त पदांचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे. I) GEN - सर्वसाधारण ii) LDS - महिला iii) Orphan - अनाथ iv) SP - खेळाडू v) EX - माजी सैनिक vi) PT - अंशकालीन उमदेवार vii) PA - प्रकल्पग्रस्त viii) EA - भूकंपग्रस्त.

८. प्रारुप निवडसूची प्रसिध्द केल्यानंतर काही उमेदवारांनी पदस्थापनेबाबत सन्माननिय लोकप्रतिनिधी यांची शिफारस पत्रे संचालनालयास सादर केली आहेत. अशा प्रकारे पदस्थापनेसाठी दडपण/दबाव आणू नये अन्यथा संबंधित उमेदवारांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

९. उमेदवारांच्या कागदपत्रांच्या पडताळणी अंती नियुक्ती देण्यासंदर्भात सर्वस्वी अधिकार नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या निवड समितीकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

१०. सदर निवडसूची उपरोक्त संदर्भ क्र ३ नुसार प्रसिद्ध करण्यात आलेल्या दिनांकापासून संदर्भ क्र ४ आणि ५ नुसार देण्यात आलेल्या कालमर्यादेनुसार वैध राहील व त्यानंतर सदरील निवडसूची आपोआप व्यपगत होईल.

सोबत :- महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य), श्रेणी क भाग-३ अंतिम निवडसूची व भाग-४ अतिरिक्त अंतिम निवडसूची ( प्रतीक्षासूची )

(अभिषेक कृष्णा भा.प्र.से.)
अध्यक्ष, निवड समिती व आयुक्त तथा संचालक ,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई